पुण्यनगरी

# दूरशिक्षण 'मध्ये तंबाखूमुक्तीची शपथ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत ३१ मे रोजी जागतिक तंबाखूविरोधी दिन साजरा करण्यात आला. या अंतर्गत तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ नियंत्रण कायदा २००३, ई- सिगारेट बंदीबाबतच्या अध्यादेशाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी तंबाखूमुक्तची शपथ घेण्यात आली. सहायक प्रा. डॉ. नितीन रणदिवे यांनी स्वागत केले. संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे, सहायक कुलसचिव पी. एस. शिरोळे, कक्ष अधिकारी एन. पी. साळोखे, सहायक कुलसचिव यू. जी. करवडे, समन्वयक डॉ. के. बी. पाटील, सांगली विभागीय केंद्र समन्वयक डॉ. एस. व्ही. माने, ऑफिस सुपरवायझर व्ही. व्ही. वरुटे आदी उपस्थित होते.

तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठात मिळणार स्टार्टअप्सना प्रोत्साहन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात रिसर्च अँड डेव्हलपिंग फौंडेशन सेंटर सुरु झाले आहे. या सेंटरमधुन शेती, संगणक, रसायन, आरोग्य, पर्यावरण, अन्न आदी क्षेत्रामधील २७ उद्योगांना प्रोत्साहन देण्याचे काम सुरु आहे. त्याच माध्यमातून विद्यापीठाच्या विद्यार्थी संशोधक व नागरिकांच्या समस्यांवर 'मंथली इनोवेशन चॅलेंज' या उपक्रमातून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. इतर विषयांतील नाविन्यपूर्ण संकल्पना व उद्योगाबाबत केंद्रातून युवकांना संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यातून निवड झालेल्या स्टार्टअप्सना महाराष्ट्र स्टेट इनोव्हेशन सोसायटी, महाराष्ट्र राज्य, स्टार्टअप इंडिया, केंद्र सरकार, व इतर खाजगी संस्थांकडून आर्थिक मदत मिळण्याची संधी आहे. तरी विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी २० जूनपर्यंत विद्यापीठाच्या वेबसाईटवर गुगल फॉर्म भरून योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे नवसंशोधन केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी सकाळी १०.३० ते सायंकाळी ६.०० या वेळेत कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क कक्ष
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
03 JUN 2023

# प्राचार्यांकडून 'पेपरफुटी'चा अहवाल सादर

## परीक्षेच्या पहिल्या दिवसापासून सीसीटीव्ही फुटेज मागविले

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २ : बी. कॉम. अभ्यासक्रमातील ॲडव्हान्स अकाउंटन्सी पेपर (क्रमांक चार) फुटी प्रकरणाचा संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांचा अहवाल शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाला आज सादर केला. उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू झाल्याच्या दिवसापासूनचे या महाविद्यालयातील सीसीटीव्ही फुटेजची मागणी परीक्षा मंडळाने केली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी परीक्षेत बुधवारी ॲडव्हान्स अकाउंटन्सी पेपर फुटल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या निदर्शनास आले. या प्रकरणाची विद्यापीठाकडून चौकशीची प्रक्रिया गुरुवारपासून सुरू झाली. याअंतर्गत परीक्षा मंडळाने संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडून अहवाल आणि एसआरपीडी कक्षातील सीसीटीव्ही फुटेजची मागणी केली होती. त्यानुसार महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांचा अहवाल सादर केला. त्यादिवशी महाविद्यालयाकडून झालेल्या कार्यवाहीची माहिती आणि २५ मे पासूनचे सीसीटीव्ही फुटेजची मागणी केली आहे. ते प्राप्त झाल्यानंतर त्यावरील निरीक्षणे नोंदवून अहवाल परीक्षा प्रमाद समितीला सादर केला जाणार असल्याचे परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी सांगितले.

दरम्यान, बी. एस्सी., कॉम्प्युटर सायन्स, फूड टेक्नॉलॉजी अँड मॅनेजमेंट, शुगर टेक्नॉलॉजी अशा विविध २१ अभ्यासक्रमांची परीक्षा शुक्रवारी झाली. त्यासाठी एकूण १२२६१ विद्यार्थी उपस्थित होते. या परीक्षेच्या कालावधीत भरारी पथकाने एकूण ३१ विद्यार्थ्यांना 'कॉपी' करताना पकडले. त्यात कोल्हापूर जिल्ह्यातील १८ आणि सातारा जिल्ह्यातील १३ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. त्यांच्यावर परीक्षा प्रमाद समितीच्या माध्यमातून विद्यापीठ नियमानुसार कारवाई होणार आहे.